20 JUL 2023
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दर्जेदार शिक्षण देऊन उद्योगशील नागरिक घडवावा

## डॉ. प्रमोद पाटील : विजयवंत महोत्सवाचा समारोप, बक्षीस वितरण समारंभ संपन्न

**पेठवडगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक गोष्टीची चांगली टीम असली पाहिजे. जेणेकरून शैक्षणिक ठसा समाजात उमटवता येईल. व्यावसायिक शिक्षण काळाची गरज आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच सध्या कमी कालावधीत कौशल्यपूर्ण व व्यावसायिक दर्जेदार शिक्षण देऊन उद्योगशील नागरिक घडवावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी केले.

येथील श्री. शाहू शिक्षण प्रसारक सेवा मंडळ आयोजित 'विजयवंत महोत्सव २०२३'च्या समारोप व बक्षीस वितरण समारंभात अध्यक्षस्थानावरून बोलत होते. प्रमुख पाहुणे डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ कुलपती डॉ. संजय पाटील होते. यावेळी संस्था अध्यक्ष गुलाबराव पोळ, सचिव विद्याताई पोळ, करणसिंह पोळ प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, देशात व राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अवलंब सुरू झाला आहे.

यावेळी विद्याताई पोळ यांनी स्व. विजयसिंह यादव यांचा शाहू शिक्षण संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी ज्या संधी येतील त्या स्वीकाराव्यात. अभ्यासाशिवाय पर्याय नाही. तुम्हाला शैक्षणिक प्रवासात,



**पेठवडगाव : येथील विजयवंत महोत्सव २०२३ च्या समारोप व बक्षीस वितरण समारंभात बोलताना डॉ. प्रमोद पाटील. सोबत इतर मान्यवर.**

प्रगतीसाठी काय हवे ते सांगा. संस्था त्याबाबत मागे हटणार नाही. अभ्यासात मागे हटू नका, असे आवाहन केले.

मान्यवरांच्या हस्ते राहुल विलास निचिते, बळवंतराव यादव हायस्कूल यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार, गजानन बाजीराव तोडकर, कल्याणी पोळ स्कूल यांना गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी, ऋषीकेश राजू यादव, बळवंतराव यादव मराठी शाखा यांना आदर्श प्रशासकीय सेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच विविध शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या माजी विद्यार्थी शुभम शिवाजी सुतार, रोहन राजाराम पोवार, आकाश प्रकाश उदाळे, ओंकार राजेंद्र कावरे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास सुनील हुकेरी, जयभवानी पतसंस्था चेअरमन विलास सणगर, शेलार सूर्यवंशी, संदीप पाटील, जवाहर सलगर, परवीन फकीर, संगीता मिरजकर, अनिता चव्हाण, ऊर्मिला उंडाळे, लता सूर्यवंशी, कार्यवाहक अभिजित गायकवाड, गुरुप्रसाद यादव, रणजित यादव आदी उपस्थित होते.

20 JUL 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडापटूंनी मानसिक तंदुरुस्तीकडेही लक्ष द्यावे

## अमेरिकन क्रीडातज्ज्ञ डॉ. फ्रँक व्हेट, शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय क्रीडा वेबिनार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्रीडापटूंनी शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक तंदुरुस्तीकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. खेळत असताना उद्भवणाऱ्या ताणतणावांचा सामना जितक्या सहजतेने करता येईल, तितका खेळ उंचावणे शक्य होईल. त्यादृष्टीने त्यांच्या प्रशिक्षकांनी त्यांच्या मानसिकतेवर काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील टेक्सास येथील मिड वेस्टर्न स्टेट विद्यापीठाचे प्राध्यापक व क्रीडातज्ज्ञ डॉ. फ्रँक बी. व्हेट यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि मीड वेस्टर्न स्टेट युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने 'कॉम्पिटिटीव्ह स्पोर्टस् अँड ग्लोबल अपॉर्च्युनिटीज' या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबविनारमध्ये डॉ. व्हेट हे 'फिजिऑलॉजिकल थ्रेशोल्ड इन ट्रेनिंग दि कॉम्पिटिटीव्ह स्पोर्टस्' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. फ्रँक व्हेट म्हणाले, भारतीय क्रीडापटू आणि प्रशिक्षक व मार्गदर्शक हे क्रीडापटूंच्या शारीरिक तंदुरुस्तीवर काम करतात; पण त्यांचा भर हा केवळ स्नायूंच्या पिळदारपणावर आणि सक्षमतेकडे अधिक असतो. तसे करणे योग्यच आहे; मात्र त्याच्याबरोबरीने शरीरातील रक्ताभिसरण, श्वासोच्छ्वास आदींच्या क्षमतावर्धनाकडेही लक्ष देणे आवश्यक आहे.

यावेळी डॉ. सेथ स्केल्टन, पल्लवी देसाई यांनी मार्गदर्शन केले. आयोजनासाठी अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक गौरेश पवार, अक्षय कारेकर, डॉ. रोहित पाटील, पृथ्वीराज सरनाईक, सुचय खोपडे यांनी परिश्रम घेतले.

लोकमत

# क्रीडापटूंच्या मानसिक तंदुरुस्तीकडे लक्ष द्यावे : फ्रँक व्हेट

कोल्हापूर : क्रीडापटूंनी शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक तंदुरुस्तीकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. खेळताना ताणतणावांचा सामना जितक्या सहजतेने करता येईल, तितका खेळ उंचावणे शक्य होईल. त्या दृष्टीने त्यांच्या प्रशिक्षकांनी त्यांच्या मानसिकतेवर काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील टेक्सास येथील मिड वेस्टर्न स्टेट विद्यापीठाचे प्राध्यापक व क्रीडातज्ज्ञ डॉ. फ्रँक बी. व्हेट यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि मीड वेस्टर्न स्टेट युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी सायंकाळी ६ ते १० या कालावधीत 'कॉम्पिटिटिव्ह स्पोर्ट्स अँड ग्लोबल ऑपॉर्च्युनिटीज्' या विषयावर आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले. यात डॉ. व्हेट हे 'फिजिऑलॉजिकल थ्रेशोल्ड इन ट्रेनिंग दि कॉम्पिटिटिव्ह स्पोर्ट्स' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते, तर कुलसचिव डॉ. विलास शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. फ्रँक व्हेट म्हणाले, भारतीय क्रीडापटू, प्रशिक्षक व मार्गदर्शकांनी रक्ताभिसरण, श्वासोच्छ्वास आदींच्या क्षमतावर्धनाकडेही अधिकाधिक लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे शारीरिक स्वास्थ्य, तंदुरुस्ती दीर्घकाळ टिकविणे शक्य होते. डॉ. सेथ स्केल्टन, पल्लवी देसाईंनी मार्गदर्शन, तर डॉ. शरद बनसोडे यांनी वेबिनारचे संचालन केले.